REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# पश्चिम खान्देश आणि राष्ट्रीय चळवळ

प्रा. जी. एन. पाटील[1] , प्रा. डॉ. ए. एम. बैसाणे[2]
[1] गंगामाई एज्युकेशन ट्रस्टचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नगांव, ता. जि. धुळे. (महाराष्ट्र राज्य)
[2] जयहिंद शैक्षणिक संस्थेचे , झे. बी. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धुळे.

## प्रस्तावना



इतिहासाचे पुन्हा–पुन्हा लेखन व्हावे ही वर्तमान व भविष्यकाळाची गरज आहे. तशीच गरज प्रादेशिक इतिहासाचे लेखन व्हावे ही सुद्धा काळाची गरज आहे. आजपर्यंत भारतीयांसाठी प्रादेशिक प्रांतिक इतिहासाकडे दुर्लक्ष केलेले दिसते. वास्तविक पाहता राष्ट्रीय चळवळीत हिंदुस्थानातील सर्व प्रदेशांचे योगदान आहे. त्यात राष्ट्रीय चळवळीत पश्चिम खानदेशाचे योगदान हे ही महत्त्वाचे आहे. म्हणून शोधनिबंधासाठी पश्चिम खानदेश आणि राष्ट्रीय चळवळ या विषयाची निवड संशोधकाने केली आहे.

खानदेश हा मुघल साम्राज्यातील दक्षिण भारतातील सहा सुभ्यांपैकी एक सुभा होता. तर ब्रिटिश अमदानीत इ. स. 1825 मध्ये खानदेशचे तीन विभाग पाडले. इ. स. 1889 मधये मालेगाव, नांदगाव व बागलान हे तालुके नाशिक जिल्ह्यात जोडण्यात आले. याचवर्षी स्वतंत्र जिल्हा म्हणून खानदेश अस्तित्वात आला. खानदेश जिल्ह्याचे प्रमुख केंद्र धुळे येथे ठेवण्यात आले. इ. स. 1960 मध्ये देशातील भाषावार राज्य पुनर्रचनेच्या धोरणानुसार महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. त्याचवर्षी डांग गुजरातला जोडून खानदेश या जिल्ह्याचे पूर्व खानदेश व पश्चिम खानदेश असे दोन जिल्ह्यात विभाजन झाले. पूर्व खानदेशाचे जळगाव तर पश्चिम खानदेशचे धुळे जिल्हा असे नामकरण करण्यात आले. 1999 मध्ये धुळे जिल्ह्यातील बहुसंख्य आदिवासींचे प्रमाण पाहता नंदुरबार या स्वतंत्र जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली.

प्राचीन काळापासून भारतावर अनेक राज्यकर्त्यांनी आक्रमणे केलीत. मध्ययुगात मुस्लीम आक्रमणे झालीत. यातील काही आक्रमक भारता स्थिरावलेत. पुढे युरोपियनांनी व्यापारी संबंधाबरोबर राजकीय वर्चस्व प्रस्थापित केले. भारतभर युरोपियनांची राजकीय सत्ताकेंद्रे निर्माण केली. ब्रिटिशांच्या वर्चस्वातून मातृभूमीच्या मुक्ततेकरीता अनेक क्रांतीकारकांनी बलिदान दिले. भारतीय राष्ट्रीय आंदोलनात महाराष्ट्राबरोबर पश्चिम खानदेशचे योगदानही महत्त्वाचे आहे.

महाराष्ट्राचा उत्तर–पश्चिम भाग म्हणजे पश्चिम खानदेश होय. राष्ट्रीय पातळीवरील शैक्षणिक, सामाजिक व राजकीय चळवळीचा खोलवर परिणाम पश्चिम खानदेशातील समाजजीवनावर होत होता. भारतीय राष्ट्रीय चळवळीत तिनही कालखंडात पश्चिम खानदेशचा सहभाग हा वैशिष्ट्यपूर्ण होता. आदिवासींमध्ये अनेक सशस्त्र क्रांतीकारी पुरुष पश्चिम खानदेशात होवून गेलेत. त्यांचे देखील योगदान राष्ट्रीय चळवळीत महत्त्वाचे आहे. भिल्ल नेता चिल्या नाईकाला इंग्रजांनी फासावर लटकावले. हा चिल्या नाईक खानदेशातील पहिला क्रांतीवीर हुतात्मा ठरला.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये

प्रत्येक संशोधन करण्यामागे काही ना काही उद्दिष्ट्ये असतात. प्रस्तुत शोध निबंधाचा अभ्यास डोळ्यासमोर ठेवून खालील उद्दिष्ट्ये संशोधकाने ठरविलेली आहेत.

1) भारतीय राष्ट्रीय चळवळीचा अभ्यास करणे.
2) भारतीय राष्ट्रीय चळवळीत पश्चिम खानदेशचा सहभाग अभ्यासणे.

3) भारतीय राष्ट्रीय चळवळीत पश्चिम खानदेशातील आदिवासींचे कार्य अभ्यासणे.

## माहितीचे विश्लेषण

### 1) 1857 चा उठाव व पश्चिम खानदेशातील भिल्ल क्रांतीकारक

सुमारे 20 वर्षे ब्रिटिशांनी प्रयत्न केल्यानंतर काही काळ खानदेशमध्ये शांतता नांदू लागली, पण ह्याचवेळी 1857 चा उठाव सुरू झाला. या उठावाच्या बातम्या पश्चिम खानदेशच्या भूमीवर येऊन धडकू लागल्या. त्यामुळे पश्चिम खानदेशमध्ये भिल्लांच्या चळवळी सुरू झाल्या. पश्चिम खानदेशात काजीसिंग ऊफ खाज्या नाईक हा आदिवासींचा प्रमुख नेता होता. हा इंग्रज सरकारच्या एका कंपनीत नोकरीवर होता. सेंधवा ते शिरपूर या खानदेशातील 40 मैलाच्या महामार्गावर चौकीदार म्हणून काजीसिंग होता, त्याने ब्रिटिशांची प्रामाणिकपणे नोकरी केली. परंतु इ. स. 1851 मध्ये त्याच्या हातून एका गुन्हेगाराचा कबुली जबाब घेताना मृत्यू झाला. त्या गुन्हेगाराचा मृत्यूचा आरोप काझीसिंगावर ठेवण्यात आला व या आरोपाखाली त्याला 10 वर्षांची कब्देची शिक्षा ठोठवण्यात आली. ब्रिटिश सरकारची प्रामाणिकपणे पूर्वी नोकरी केली असल्यामुळे काझीसिंगला 5 वर्षांनी तुरुंगातून मुक्त केले. काझीसिंग पुन्हा जून 1857 मध्ये ब्रिटिशांच्या नोकरीत हजर झाला. एकदा कॅप्टन बर्च आणि रिसालेदार यांनी काझीसिंगला एक लहान चुकीबद्दल शिक्षा शिव्या दिल्या त्यामुळे काझीसिंगचा स्वाभिमान दुखावला. त्याने आपल्या नोकरीचा त्याग केला. आपले आदिवासी भिल्ल साथीदार जमा करून त्याने ब्रिटिश शासनाविरोधात बंड उभारले. सप्टेंबर 1857 पासून या उठावास पश्चिम खानदेशमध्ये खरी सुरुवात झाली.

भीमा नाईकच्या नेतृत्वाखाली भिल्लांनी ले. केनेडीया तुकडीवर हल्ला चढविला. भीमा नाईक हा स्वतःला यावेळी खानदेशमध्ये दिल्लीचा बादशहाचा प्रतिनिधी मानत होता, 1 नोव्हेंबर 1857 रोजी तर काझीसिंग, भीमा नाईक आदींनी कमालच केली. खानदेशचा कलेक्टरचा मुक्काम जेथे होता तेथील जवळची दोन खेडी लुटली. 1857 च्या उठावात पश्चिम खानदेशातील भिल्लतर उतरलेच पण आजुबाजूच्या प्रदेशातील भिल्लही त्यात उतरले.

### राष्ट्रीयचळवळ (इ.स. 1885 ते 1920.) आणि पश्चिमखानदेश

इ.स. 1885 मध्ये मुंबई येथे राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. प्रारंभीच्या काळातील भारतीय राष्ट्रीय चळवळ ही राष्ट्रीय सभेशी निगडीत होती. राष्ट्रीय सभेच्या अगदी प्रारंभीपासून पश्चिम खानदेशचा राष्ट्रीय सभेशी संबंध आहे. 28 डिसेंबर 1885 मध्ये मुंबई येथे सर गोकुळदास तेजपाल संस्कृत महाविद्यालयात राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन भरले, हे अधिवेशन तीन दिवस चालले. देशातून 72 प्रतिनिधी उपस्थित होते. या प्रतिनिधीमध्ये पश्चिम खानदेशातील प्रतिनिधी उपस्थित होता का ? याचे उत्तर देता येणार नाही. पश्चिम खानदेशचा प्रतिनिधी जरी या अधिवेशनाला उपस्थितीत नसला तरी पश्चिम खानदेशच्या जनतेला अधिवेशनाची माहिती होती. कारण कॉंग्रेसने (राष्ट्रीय सभेने) पहिल्या अधिवेशनात एकूण 9 ठराव मंजूर केलेत. या 9 ठरावांपैकी 8 व्या ठरावात असे म्हटले आहे की, राष्ट्रीय सभेने अधिवेशनात मंजूर केलेले हे ठराव प्रांतिक सभेकडे पाठविण्यात यावेत. राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनानंतर धुळे येथे सभा झाली. या सभेने एकमुखाने कॉंग्रेसने मंजूर केलेल्या ठरावांना पाठिंबा दिला. यावरुन एवढे मात्र निश्चित की, पश्चिम खानदेशातील जनता ही सुरुवातीपासून राष्ट्रीय प्रवाहात जुळलेली दिसते.

पश्चिम खानदेशचे वैशिष्ट्य म्हणजे धुळे शहरात इ. स. 1853 मध्ये गरुड हायस्कूलची स्थापना करण्यात आली. गरुड हायस्कूलची स्थापना म्हणजेच पश्चिम खानदेशची शैक्षणिक व राष्ट्रीय जागृतीची सुरुवात होय. 19 व्या शतकाच्या शेवटच्या दशकात पश्चिम खानदेशामध्ये राष्ट्रीय वृत्ती जोपासण्याचे प्रमुख कार्य श्री. पाताळेंची व्यायाम शाळा आणि गरूड हायस्कूल यांनी केले. पुण्यात ज्या प्रमाणे सार्वजनिक सभा नावाची सामाजिक प्रबोधन आणि राजकीय जागृती करणारी संस्था कार्य करीत होती. या सामाजिक संस्थेसारखी संस्था आपल्या पश्चिम खानदेशात देखील कार्यरत असावी, असा उद्देश डोळ्यासमोर ठेवून श्री. शंकर श्रीकृष्ण देव व त्यांच्या सहकाऱ्यांनी 19 मे 1893 रोजी धुळे येथे सत्कार्योत्तेजक सभा नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून पश्चिम खानदेशात राष्ट्रीय जागृतीला सुरुवात झाली. या सभेने पश्चिम खानदेशात श्री. गणपती आणि छत्रपती शिवाजी जन्मोत्सव सुरू केला.

इ. स. 1896 मध्ये महाराष्ट्रात दुष्काळ पडला. ब्रिटिश शासनाने दुष्काळ जाहिर करण्याचे लांबणीवर टाकले. तेव्हा लोकमान्य टिळकांनी अनेक लेख लिहून या परिस्थितीवर वाचा फोडली. त्याचा परिणाम पश्चिम खानदेशच्या जनतेवर झाला. त्यावेळी श्री. शंकर श्रीकृष्ण देव व त्यांच्या मित्रांनी संपूर्ण पश्चिम खानदेशचा दौरा करून इ. स. 1896 चा लँड रेव्हेन्यू कायदा दुरुस्त करणारे बील प्रांतिक कायदेमंडळात आणले. या काळात पश्चिम खानदेशातील धुळे येथे शेतकरी परिषदेचे आयोजन श्री. शंकर श्रीकृष्ण देव यांनी केले. या परिषदेच्या आयोजनामुळे पश्चिम खानेदशातील शेतकऱ्यांमध्ये मोठी राष्ट्रीय जागृती निर्माण झाली.

पश्चिम खानदेशमध्ये प्रारंभी लोकमान्य टिळकांच्या अनुयायांचे वर्चस्व होते. श्री. शंकर श्रीकृष्ण देव, श्री. चांदोरकर, श्री. तात्यासाहेब भट, श्री. जावडेकर इत्यादी मंडळी लोकमान्य टिळकांच्या पक्षाची होती. येथील जनतेच्या मनात लोकमान्य टिळकांविषयी मोठा आदर होता. इ.स. 1908 मध्ये जेव्हा लोकमान्य टिळकांना सक्त मजुरीची शिक्षा झाली. तेव्हा साक्री

तालुक्यातील कासारे गावातील मुलांनी शाळा बंद पाडली. व ब्रिटिश सरकारविरुद्ध रोष प्रकट केला. ब्रिटिश सरकारला ही वार्ता कळताच सरकारने गावातील शाळा चार वर्षे बंद केली होती. होमरुल चळवळीच्या निमित्ताने लोकमान्य टिळक धुळे शहरात इ. स. 1917 मध्ये आले होते. त्यांचा मुक्काम श्री. माधवराव आपटे यांच्याकडे होता. लोकमान्य टिळकांचा धुळे शहरातील पहिला कार्यक्रम पाचंकदील जवळील गोल चावडीच्या ओट्यावर झाला. या कार्यक्रमात श्रोते आणि दर्शनार्थींची मोठ्ठी रांग लागली होती. दुसरा कार्यक्रम दुसऱ्या दिवशी संध्याकाळी विजयानंद थियटरमध्ये म्हणजे आजच्या स्वस्तिक चित्रपट गृहात झाला. या दोन कार्यक्रमामुळे धुळेकर जनता टिळकांच्या विचारांनी भारावून गेली.

लोकमान्य टिळकांची प्रकृती जेव्हा विकोपास गेली तेव्हा पश्चिम खानदेशातील लोकमान्य टिळकांच्या अनुयायांना तारा आल्या. तेव्हा धुळे शहरातील श्री. शंकर श्रीकृष्ण देव यांनाही तार आली. त्यावेळी श्री. देव यांचे वडील असन्नमरण अवस्थेत होते. अशावेळी श्री. देव यांनी आपल्या वडीलांपेक्षा लोकमान्य टिळकांना महत्त्वाचे स्थान देवून ते टिळकांच्या भेटीसाठी गेले. 1 ऑगस्ट 1920 रोजी लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाला. दोंडाईचाचे श्री. नानाशेट शिंपी हे लोकमान्य टिळकांच्या प्रेत यात्रेला मुंबई येथे गेले. लोकमान्य टिळकांची भव्य प्रेत यात्रा पाहून त्यांनी पुढील काळात राष्ट्रीय चळवळीस वाहून घेण्याचे ठरविले. म्हणजे लोकमान्य टिळकांचा मृत्यू ही घटना पश्चिम खानदेशातील जनतेला राष्ट्रीय चळवळीची प्रेरणा देऊन गेली.

ज्याप्रमाणे लोकमान्य टिळकांच्या विचारांनी प्रभावित झालेला एक वर्ग पश्चिम खानेदशात काम करीत होता त्याचप्रमाणे सशस्त क्रांतीच्या मार्गानेच देशाला स्वातंत्र्य मिळू शकते असे मानणारा एक वर्ग पश्चिम खानदेशात होता. त्यांचे आधार म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'मित्रमेळा' निर्माण करून बलशाली. सामर्थ्यवान असे नवफलक तयार करण्याची ठरविले. म्हणून सावरकरांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून पश्चिम खानदेशातील आप्पासाहेब व भाईसाहेब रणदीवे या बंधूनी पश्चिम खानदेशातील तरुणांचे संघटन तयार करून राष्ट्रीय जागृती केली.

## महात्मा गांधी आणि पश्चिम खानदेश

ज्याप्रमाणे लोकमान्य टिळकांचे नाते पश्चिम खानदेशाशी जमले होते त्याप्रमाणे टिळकांच्या मृत्यूनंतर महात्मा गांधीजींचे देखील पश्चिम खानदेशशी नाते जमलेले दिसते. पश्चिम खानदेशात महात्मा गांधीजींचा दौरा 12 ते 15 फेब्रुवारी 1927 या काळात झाला. 12 फेब्रुवारी 1927 या दिवशी गांधीजी अमळनेरहून शिंदखेडा रेल्वे स्टेशनवर दु.11.48 वाजता उतरले येथील सभा संपन्न झाल्यावर ते शहादा येथे गेले. 13 फेब्रुवारी 1927 रोजी सोनगीर येथे आले. सोनगीर येथे गुरू गोविंद महाराजांच्या समाधीसमोर गांधीजींची सभा झाली. सोनगीर येथील संपल्यानंतर गांधीजी धुळे येथे आले. निजामपूर, पिंपळनेर. साक्री, नेर, इ. गावांना भेटी दिल्या. पश्चिम खानदेशचा दौरा आटोपून गांधीजी मालेगावकडे निघाले. गांधीजींचा पश्चिम खानदेशचा हा दौरा म्हणजे येथील जनतेला राष्ट्रीय चळवळीत भाग घेण्यासाठी प्रवृत्त करणारा ठरला.

साबरमती आश्रमात अखिल भारतीय कॉंग्रेस पक्षाची बैठक फेब्रुवारी 1930 मध्ये झाली. त्या बैठकीत हिंदुस्थानात सक्रिय कायदेभंग करण्याचा निर्णय घेण्यात आला. याचविषयीचे नेतृत्व महात्मा गांधीजींकडे कॉंग्रेस पक्षाने सोपविले आणि साऱ्या भारतभर सविनय कायदेभंग चळवळीची सुरुवात झाली. पश्चिम खानदेशातही प्रचंड प्रमाणात जनतेने चळवळीत सामील होवून ब्रिटीश सरकारला विरोध झाला. 12 मार्च 1930 रोजी गांधीजींनी दांडी यात्रेची सुरूवात केली. पश्चिम खानदेशातील नवल आनंदा पाटील, श्री. रामचंद्र बाबा मोहाडीकर, रंगनाथ टोणगावकर हे तिघे विद्यार्थी या यात्रेत सामील होण्यासाठी दांडीकडे गेले आणि एक दिवस त्या प्रचंड सोहळ्यात सामील होवून आले.पश्चिम खानदेश मधील प्रमुख नेतेश्री बाळुभाई मेहता आणि इतर कार्यकर्ते यांनी संपूर्ण जिल्ह्यात कायदेभंग चळवळीसाठी स्वयंसेवक मिळविण्यासाठी दौरा काढला. सविनय कायदेभंगाच्या चळवळीत पश्चिम खानदेशातील किती स्वातंत्र्यवीर तुरुंगात गेले किंवा त्यांना किती दंड झाला याचे नक्की आकडे उपलब्ध नाहीत. परंतु काही तुरुंगात जाणाऱ्या स्वातंत्र्य सैनानीची तालुकावार वर्गवारी पुढीलप्रमाणे सांगता येईल. शहादे 175, धुळे 62, साक्री 47, शिंदखेडा 50, नंदुरबार 40, शिरपूर 13, नवापूर 10, तळोदा 7 एकूण सुमारे 400.

## पश्चिम खानदेश आणि 1942 चे चलेजाव आंदोलन

8 ऑगस्ट 1942 रोजी मुंबई येथे झालेल्या कॉंग्रेसच्या महासमितीने 'चलेजाव' आंदोलनाचा ठराव मंजूर केला. महात्मा गांधीजी हा संदेश 9 ऑगस्टला जाहिर सभेतून देणार होते त्या पूर्वीचे सरकारने गांधीजींना व कॉंग्रेसच्या प्रमुख नेत्यांना भल्या पहाटे अटक केली. महात्मा गांधीजींनी तुरुंगात जाण्यापूर्वी आपल्या अनुयायांना करेंगे या मरेंगे हा संदेश दिला. पश्चिम खानदेशातून श्री. बाळुभाई मेहता हे मुंबईच्या अधिवेशनात गेले होते. पश्चिम खानदेशात पुढील कार्यक्रम डांगुर्णे येथील एका मळ्यात घेण्यात आली. या बैठकीत पश्चिम खानदेशातील 'चलेजाव' चळवळीचे नेतृत्व श्री. बाळुभाई मेहता यांच्याकडे सोपविण्यात आले. कार्याच्या सोयीसाठी धुळे जिल्ह्याचे विभाजन करून शहादा, तळोदा, नवापूर, नंदुरबार हे तालुके श्री. शंकर विनायक ठकार यांच्याकडे सोपविले तर साक्री, धुळे, शिरपूर, शिंदखेडा हे तालुके श्री. विष्णू सिताराम पाटील आणि श्री. रंगनाथ टोणगावकर यांच्याकडे सोपविले. कॉंग्रेसच्या नेत्यांना पकडून एक महिना झाला होता. त्याचा

स्मृतिदिन म्हणून नंदुरबार येथील म्यूनिसिपल हायस्कूलमधील शिरीष कुमार आणि विद्यार्थ्यांनी गावातून मिरवणूक काढली. या मिरवणुकीवर पोलीसांनी गोळीबार केला. त्यात शिरीषकुमार मेहता याचे साथीदार हुतात्मे झाले. 14 एप्रिल 1944 रोजी चिमठाणे येथे साडेपाच लाखाच्या सरकारी खजिन्याची लूट केली. 15 ऑगस्ट 1947 रोजी हिंदुस्थान स्वतंत्र झाला. पश्चिम खानदेशातील सर्वत्र पहिला स्वातंत्र्य दिवस मोठ्या आनंदाने साजरी करण्यात आला.

## निष्कर्ष

(1) इतिहासाचे पुनर्लेखन करणे ही काळाची गरज आहे हे निष्कर्षाअंती दिसून येते.
(2) भारतीय राष्ट्रीय चळवळीत पश्चिम खानदेशा संबंध हा सुरुवातीपासून अभ्यासांअती दिसून येते.
(3) भारतीय राष्ट्रीय चळवळीच्या तिन्ही कालखंडात पश्चिम खानदेशचा सहभाग हा वैशिष्ट्यपूर्ण दिसून येतो.
(4) आदिवासींमध्ये अनेक क्रांतीकारी पुरुष पश्चिम खानदेशात होवून गेलेत त्याचे देखील योगदान राष्ट्रीय चळवळीत महत्त्वाचे आहे.
(5) लोकमान्य टिळकांच्या विचार प्रवाहाचा प्रभाव येथील नेत्यांवर दिसून येते.
(6) महात्मा गांधीजींचा पश्चिम खानदेशातील दौरा हा येथील जनतेला राष्ट्रीय चळवळीत भाग घेण्यासाठी प्रवृत्त करणारा ठरलेला दिसून येतो.

## संदर्भ –

1) ***Maharashtra State Gazetteers***, Government of Maharashtra, Dhule District 1974.
2) पाटील मधुकर, कंपनी सरकारकालीन खानदेश, शिवम प्रकाशन, नंदुरबार, प्रथमावृत्ती 2005
3) शहा जी.बी., धुळे व नंदुरबार जिल्ह्याचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान, प्रथमेश प्रकाशन, देवपूर, धुळे, प्रथमावृत्ती 2004.
4) शहा जी. बी., खानदेशमधील राष्ट्रवादाचा उदय आणि विकास (खानदेशचा इतिहास), प्रशांत पब्लिकेशनस जळगाव, प्रथमावृत्ती 2014
5) देसले वसंत, बाळुभाई मेहता, एम. फिल. प्रबंध (अप्रकाशित), पुणे, विद्यापीठ पुणे, 1995.
6) सरोदे पीतांबर,पाटील विश्वास, नंदुरबारचे अमर शहीद, आंतरभारतीय अध्ययन अनुसंधान केंद्र, धुळे – 2009
7) शहा, मु. ब. (संपादक), खानदेशचा सांस्कृतिक इतिहास खंड –4, का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे 2004
8) शहा जी.बी.,धुळे जिल्हा कॉंग्रेस शताब्दी महोत्सव स्मरणिका –1985